# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-09.08.2026** **वार- रविवार**

---

**<u>क्रांतिदिन-पिंपरी चिंचवड</u>**

क्रांतीदिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रमांतून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं चिंचवड इथं हुतात्मा चापेकर बंधू समूह शिल्प, चिंचवड स्टेशन इथं क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि थोर क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्यास तसंच दापोडी इथं शहीद भगतसिंग आणि शहीद नारायण दाभाडे यांच्या पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. पुणे शहरातही क्रांतिकारकांना हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

“ देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांमुळेच आज आपण स्वातंत्र्य अनुभवत आहोत. त्यांच्या बलिदानातून देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, धैर्य आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा घेऊन तरूणांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी योगदान देण्याची गरज आहे,” असं प्रतिपादन शर्मिला बाबर यांनी केलं.

**<u>विद्यापीठ</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज ‘नामविस्तार दिन’ निमित्त विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. १८४८ मध्ये भिडेवाड्यातून सुरू झालेल्या स्त्री शिक्षणाच्या चळवळीचा आणि सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाचा सन्मान म्हणून ९ ऑगस्ट २०१४ रोजी पुणे विद्यापीठाचा नामविस्तार करण्यात आला होता. सावित्रीबाईंच्या विचारांचा वारसा जपत विद्यापीठाच्या प्रगतीची वाटचाल निरंतर सुरू ठेवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.
दरम्यान, आजच्या जागतिक आदिवासी दिनानिमित विद्यापीठात क्रांतीवीर बिरसा मुंडा अध्यासनाच्या वतीनं अभिवादन करण्यात आलं. यावेळी क्रांतीवीर बिरसा मुंडा अध्यासनाचे प्रमुख प्राध्यापक डॉक्टर अविनाश आडे यांच्यासह विभागप्रमुख आणि संचालक उपस्थित होते.

**<u>ऊस उत्पादकांना एफ आरपी</u>**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वर्ष २०२५-२६ च्या गळीत हंगामात देय असलेल्या रास्त आणि किफायतशीर दर म्हणजे एफआरपीची ९९ पूर्णांक ३७ शतांश टक्के रक्कम अदा करण्यात आली असून, अद्याप २५६ कोटी रुपयांची थकबाकी शिल्लक असल्याची माहिती साखर आयुक्तालयानं दिली आहे. राज्यातील २१० साखर कारखान्यांनी या गळीत हंगामात एकूण १ हजार ४५ लाख टन ऊसाचं गाळप केलं. एफआरपीच्या देयकांचा विचार करता, साखर कारखान्यांनी तोडणी आणि वाहतूक खर्चासह ४० हजार १९० कोटी रुपये शेतकऱ्यांना अदा केले आहेत.

**<u>पुणे जिल्हा बँक कर्जरोखे</u>**

पुणे जिल्ह्यातील नागरी आणि ग्रामीण पतसंस्थांच्या तरलतेसाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्जरोखे खरेदी करण्यास राज्य सरकारनं मंजुरी दिली आहे. यामुळं या पतसंस्थांना किमान गुंतवणुकी पैकी ५ टक्के गुंतवणूक या कर्जरोख्यांमध्ये करता येणार असून, येत्या११ ऑगस्टपर्यंत हे कर्जरोखे खरेदी करता येणार असल्याचं जिल्हा बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शितोळे यांनी सांगितलं.

**<u>मनपा</u>**
पुणे महापालिकेच्या महिला आणि बालकल्याण योजनांसाठी लाभार्थी कुटुंबांची वार्षिक उत्पन्न मर्यादा एक लाखांवरून अडीच लाख रुपये करण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीनं मान्यता दिली असल्याचं समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितलं. यामुळं कौशल्य विकास, स्वयंरोजगार, अर्थसहाय्य आणि बचत गटांच्या प्रशिक्षण योजनांचा लाभ अधिकाधिक गरजू महिलांना मिळणार आहे,असंही त्यांनी सांगितलं.

**<u>मध्य रेल्वे</u>**
मध्य रेल्वेने चालू आर्थिक वर्षात ५ ऑगस्टपर्यंत भंगार विक्रीतून २०२.५५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवून एक विशेष कामगिरी नोंदवली आहे. मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीच्या तुलनेत यात ७६ पूर्णांक ९४ शतांश टक्के इतकी लक्षणीय वाढ झाली आहे. या आर्थिक वर्षातली ही आतापर्यंतची सर्वाधिक भंगार विक्री ठरली आहे. तसंच भंगार विक्रीतून २०० कोटी रुपयांचा टप्पा गाठण्याची ही आतापर्यंतची सर्वांत जलद कामगिरी आहे. मध्य रेल्वेच्या सर्व विभागांनी आणि डेपोंनी या कामगिरीत महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचं मध्य रेल्वेनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>पीएमआरडीए</u>**
लवळे परिसरातील सनीज वर्ल्ड ते सिम्बायोसिस भागात सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळं वाहतूक कोंडीसह सुरक्षेच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांवर उपाययोजना सुचवणारा एक संशोधन प्रस्ताव सीओईपीच्या बांधकाम अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्यासमोर सादर केला. त्यावर रस्त्याचं काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासोबतच सार्वजनिक सुरक्षेच्या नियमांचं काटेकोर पालन करावं, असे आदेश आयुक्त डॉ. चौधरी संबंधित विभागाला दिले.

**<u>हॉकी स्पर्धा</u>**
हॉकी महाराष्ट्र आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं आयोजित सोळावी हॉकी इंडिया कनिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा येत्या १२ ते २३ ऑगस्टदरम्यान पिंपरीतल्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर होणार आहे.
या स्पर्धेत देशभरातील ३० संघ सहभागी होणार असून, अंतिम सामना २३ ऑगस्टला होणार आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक आणि 'हॉकी महाराष्ट्र'चे अध्यक्ष कृष्ण प्रकाश, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**<u>हवामान</u>**
पुणे आणि परिसरांत आज अंशतः ढगाळ वातावरण होतं. उद्याही अंशतः ढगाळ वातावरणासह काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**